सं.फौ.ख.क्र २८५/२०२०

CNRNO. MHBU030011022020

सरकार वि. मुक्तारबेग

निशानी क्र. ०३ खाली

:: **<u>न्या य नि र्ण य</u>** ::

( दिनांक १३ ऑगस्ट २०२६ रोजी घोषीत)

**०१.** सदरील केसच्या योग्य निष्कर्षाप्रत पोहोचण्यासाठी खालील मुद्दे विचारात निघतात व खालीलप्रमाणे नमूद कारणांसहित निष्कर्ष दिलेले आहेत. आरोपीचे फौजदारी प्रक्रिया संहिताचे कलम ३१३ निवेदन नोंदवण्यात आले. त्यांनी त्यांचे विरुध्द खोटी केस केल्याचे कथन केले आहे.

| **अक्र** | **<u>मुद्दे</u>** | | **<u>निष्कर्ष</u>** |
|---|---|---|---|
| १. | अभियोगपक्षाने हे सिध्द केले आहे का की, दि. १०/१२/२०१९ रोजी आरोपीने स्वतःच्या ताब्यातील वाहन क्र **एम.एच. २८ आर ५०९** हे रस्त्याच्या मधोमध लोकांना वाहतुकीस अडथळा निर्माण होईल तसेच लोकांच्या जिवीतास हानी पोहचले अशा ठिकाणी उभा केलेला मिळून आला ? | : | होकारार्थी. |
| २. | आदेश कोणता ? | : | अंतिम आदेशाप्रमाणे. |

## <u>कारणमिमांसा</u>

न्यायालयामार्फत तपासण्यात आलेले साक्षीदार

| अ.सा. | साक्षीदारांची नांवे | साक्षी प्रकार |
|---|---|---|
| १ | **पोऊपनी बबन रामपुरे** | फिर्यादी/तपास अधिकारी |

## अभियोग पक्षातर्फे देण्यात आलेल्या निशाणी

| अ.क्र. | निशाणी क्र. | कागदपत्राचा तपशील |
|---|---|---|
| १ | ०४ | पंचनामा |
| २ | ०५ | फिर्याद |
| ३ | ०६ | प्रथम खबर अहवाल |

**<u>मुद्दा क्र.०१ व ०२ करीता :</u>**

**०२.** भारतीय दंड विधानाचे कलम २८३ अन्वये जो कोणी एखादी कृती करुन कब्जात असलेल्या मालमत्तेचा बंदबोस्त करण्याचे टाळुन कोणत्याही सार्वजनीक रस्त्यावरील कोणत्याही व्यक्तीला धोका,अटकाव किंवा इजा केली असे अभियोग पक्षाने सिध्द करणे आवश्यक आहे. त्या अनुषंगाने अभिलेखावरील पुराव्याचे अवलोकन करणे आवश्यक आहे.

**०३.** सा क्र.१ **पोऊपनी बबन रामपुरे** हे प्रस्तुत प्रकरणातील फिर्यादी व तपास अधिकारी आहे. त्यांनी असे कथन केले आहे की, दि. १०/१२/२०१९ रोजी बुलडाणा ते खामगाव रोडवरील वरवंड फाट्यावर,ता. जि. बुलडाणा येथे सार्वजनिक ठिकाणी वाहतुकीच्या रस्तयावर **एम.एच. २८ आर ५०९** हे वाहन उभे करुन रहदारीस अडथळा व धोका निर्माण होईल अशा रितीने उभे केल्याचे सांगितले. त्यामुळे त्यांनी पंचांसमक्ष नि.क्र. ०४ प्रमाणे पंचनामा आणि तदनंतर फिर्याद नि.क्र. ०५, प्रथम खबर अहवाल नि.क्र. ०६ प्रमाणे दाखल केल्याचे सांगितले.

**०४.** आरोपीतर्फे साक्षीदाराचा उलट तपास घेण्यात आला नाही. त्यामुळे साक्षीदाराचा पुरावा अखंडीत राहिला आहे. सदर साक्षीदाराच्या साक्षीवरुन घटनास्थळ हे सार्वजनीक ठीकाण म्हणजेच **बुलडाणा ते खामगाव रोडवरील वरवंड फाट्यावर,ता. जि.**

**बुलडाणा** हे आहे. आरोपीने त्याचे ताब्यातील वाहन रहदारीस धोका निर्माण होईल अशा पध्दतीने उभे केले होते व त्यामुळे सर्वसाधारण जनतेच्या जीवितास धोका निर्माण झाला असा पुरावा अभिलेखावर आलेला आहे.

०५. अभियोगपक्षाच्या कथनाप्रमाणे घटनास्थळ हे **बुलडाणा ते खामगाव रोडवरील वरवंड फाट्यावर, ता. जि. बुलडाणा** दाखवलेले आहे. त्यामुळे आरोपीचे वाहन रहदारीस धोका निर्माण होईल अशा पध्दतीने उभे होते असे विरुध्द अनुमान काढणे न्यायोचित आहे. त्यामुळे जनतेच्या जीवितास धोका निर्माण झाला असे म्हणणे योग्य ठरेल. थोडक्यात तथाकथित वाहन आरोपीने चौकामध्ये उभे करुन रहदारीस अडथळा निर्माण झाला होता हे सिध्द होते. त्यामुळे उपलब्ध पुराव्याचा विचार करता मी मुद्या क्र ०१ चे उत्तर होकारार्थी नोंदवितो.

०६. आरोपीला शिक्षा सुनावण्यापुर्वी त्याला ऐकणे नैसर्गिक न्यायाला अनुसरुन आहे. अभियोगपक्षातर्फे असा युक्तीवाद आरोपीने गुन्हा केल्यामुळे त्याला जास्तीत जास्त शिक्षा देण्यात यावी. याउलट आरोपीने असा युक्तीवाद केला की, त्याचा प्रथम गुन्हा असल्यामुळे त्याला कमीत कमी शिक्षा देण्यात यावी. सदर गुन्ह्याचे स्वरुप पाहता आरोपीस दंडाची शिक्षा सुनावणे न्याय्य आणि योग्य ठरेल या मताप्रत आले आहे. करीता मी पुढील प्रमाणे आदेश पारीत करते.

## <u>आदेश</u>

०१. भारतीय न्याय सुरक्षा संहिता चे कलम २७८ नुसार प्रस्तुत खटल्यात आरोपी **मुकतार बेग अफसर बेग** रा. डोंगरशेवली, बुलडाणा ता. जि. बुलडाणा भा.द.वी. कलम २८३ चा गुन्हा केल्यामुळे दोषी धरण्यात येवून त्याला सदर गुन्ह्याकरीता रक्कम रुपये २००/– (रक्कम दोनशे रुपये केवळ) दंड करण्यात येतो. सदर दंड न

भरल्यास दोन दिवसाची साधी कैद अशी शिक्षा ठोठावण्यात येते.

०२. प्रकरण बंद करण्यात येते.

JOSHI SHUBHANGI MUKUNDRAO
Digitally signed by JOSHI SHUBHANGI MUKUNDRAO
Date: 2026.08.13 17:49:58 +0530

दि.१३.०८.२०२६

**(श्रीमती एस.एम.जोशी )**
२ रे न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,
बुलडाणा.